# स्पर्धात्मक परीक्षेत कु. तनुजा पोटे हिला व्दितीय पारितोषिक

**प्रस्तावना :-**

महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय अमरावती येथे आंतरमहाविद्यालय स्पर्धापरीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत महाविद्यालयांतील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत विद्यार्थीनी सहभाग नोंदविला व व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

**आयोजक** :-

महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय अमरावती.

**उद्देश** :-

पदवी शिक्षणाबरोबर स्पर्धा परीक्षेचे तयारी करणे.

स्पर्धात्मक परीक्षेचा सराव करणे.

## अहवाल

दि. ३० डिसेंबर २०१८ रोजी महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय अमरावती येथे आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता स्पर्धात्मक परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक २१००/- रुपये व स्मृतिचिन्ह, व्दितीय क्रमांक १५००/- रुपये व स्मृतिचिन्ह, तृतीय क्रमांक ११००/- रुपये व स्मृतिचिन्ह तसेच तीन विद्यार्थिनींना प्रोत्साहनपर पारितोषिक जाहीर करण्यात आले. परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ असुन परीक्षा १०० गुणांची होती .

सदर परीक्षेला आमच्या महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत कु. हर्षा बेहेरे कु. तनुजा पोटे व कु. मनाली गंगथडे या विद्यार्थिनी सहभागी झाल्या.या परीक्षेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची कु. तनुजा बळीरामजी पोटे हिला गुणानुक्रमे व्दितीय क्रमांक मिळाला तसेच १५००/- व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

**फलनिष्पत्ती** - १) स्पर्धा परीक्षेमध्ये तीन विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

२) कु. तनुजा पोटे हिला व्दितीय पारितोषिक मिळाले.





कु. तनुजा पोटे हिचे अभिनंदन करताना
प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील




कु. तनुजा पोटे हिला मिळालेला पुरस्कार